# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६०१२३३
२५६०१२२२
२५६०१२०२
फॅक्स : ०२०-२५६९१३४१

परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ७.

Website : www.unipune.ernet.in
E-mail : coe@unipune.ernet.in


परीक्षा व गोदाम/२०१२/१५९ दि. १७ ऑगस्ट, २०१२

**महत्वाचे व तातडीचे**

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक
सर्व सलंग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था
( विद्यापीठ परीक्षांचे महाविद्यालयातील केंद्र )

विषय :– ऑक्टोबर २०१२ पासून घेण्यात येणाऱ्या विद्यापीठ परीक्षांसाठी आवश्यक साहित्याच्या मागणीबाबत.

महोदय,

विद्यापीठ परीक्षा मंडळाने ऑक्टोबर २०१२ पासून विविध परीक्षांचे आयोजन केलेले असून यासबंधीचे परिपत्रक विद्यापीठ संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यासोबत परीक्षा केंद्र असलेल्या महाविद्यालयांचे नांव असलेले स्वतंत्र परिपत्रक ही उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर परीक्षेसाठी आपल्या महाविद्यालयास परीक्षा केंद्र म्हणून मान्यता दिली असल्याची खातरजमा करुन घेण्यात यावी.

आपल्या महाविद्यालयास **ऑक्टोबर २०१२ मध्ये होणा–या परीक्षांसाठी** परीक्षा केंद्र म्हणून मान्यता दिलेली असल्यास सदर परीक्षेसाठी आपणांस आवश्यक असलेल्या साहित्याची / स्टेशनरीची मागणी **ऑनलाईन पध्दतीने *भरुन शनिवार दि. २५/८/२०१२ पूर्वी विद्यापीठ गोदाम विभागात पोहोचेल*** अशा पध्दतीने पाठविण्यात यावी.

विद्यापीठाने प्रथम वर्ष कला, ललितकला, मानसनीती व समाजविज्ञान, वाणिज्य, विज्ञान, विज्ञान (जैवतंत्रज्ञान) तसेच बी.बी.ए., बी.सी.ए. आणि बी.बी.एम.(आय.बी.) या अभ्यासक्रमाच्या परीक्षा शैक्षणिक वर्ष २०१० – ११ पासून महाविद्यालयाकडे वर्ग केल्या असल्याचे संदर्भ क्र. परीक्षा/समन्वय/१६३३, दि. २४ नोव्हेंबर २००९ रोजी कळविलेले आहे. या परीक्षेसाठी लागणारी स्टेशनरी व कोऱ्या उत्तरपत्रिका संबंधित महाविद्यालयाने छापून घ्यावयाच्या आहेत. त्या परीक्षांव्यतिरिक्त इतर परीक्षांसाठी आवश्यक स्टेशनरीचीच

मागणी नोंदविण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालयाकडे वर्ग केलेल्या परीक्षेसाठी विद्यापीठाची स्टेशनरी व कोऱ्या उत्तरपत्रिका वापरण्यात येऊ नये.

मार्च /एप्रिल २०१२ मध्ये वितरित करण्यात आलेल्या स्टेशनरीपैकी शिल्लक राहिलेल्या स्टेशनरीचा तपशील प्रत्येक महाविद्यालय / संस्था यांनी देणे अनिवार्य आहे. मार्च/एप्रिल २०१२ मध्ये आपणांस विद्यापीठाच्या परीक्षांसाठी वितरीत करण्यात आलेल्या स्टेशनरीपैकी काही स्टेशनरी शिल्लक असल्यास त्या स्टेशनरीचा प्रथम ऑक्टो./नोव्हें. २०१२ च्या परीक्षांसाठी उपयोग करण्यात यावा. यापूर्वीची अत्यंत जुनी व जीर्ण झालेली स्टेशनरी वापरण्यात येऊ नये व अशी स्टेशनरी अथवा परीक्षेचे साहित्य आपल्याकडे शिल्लक असल्यास त्यासंबंधीची माहिती विद्यापीठ कार्यालयाकडे स्वतंत्र पत्रान्वये कळविण्यात यावी. ही माहिती आल्यावरच पुढील कार्यवाही (issue) करण्यात येईल. म्हणजे ती घेऊन जाण्याची व्यवस्था करता येऊशशकेल. यासंबंधीची माहिती विद्यापीठ कार्यालयास न कळविल्यास ती उचलून घेऊन जाण्याची जबाबदारी विद्यापीठ कार्यालयाची राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

मार्च/एप्रिल २०१२ मध्ये आपणांस वितरीत करण्यात आलेल्या मुख्य उत्तरपत्रिका अनुक्रमांकानुसार दिलेल्या होत्या आणि ऑक्टो./नोव्हे. २०१२ मध्ये होणा–या परीक्षांसाठी देण्यात यावयाच्या मुख्य उत्तरपत्रिका हया सुध्दा अनुक्रमांकानुसार आपणांस देण्यात येणार आहेत. या उत्तरपत्रिका फक्त विद्यापीठ परीक्षांसाठी वापरण्यात याव्यात व शिल्लक राहिलेल्या उत्तरपत्रिकांची नोंद घेऊन त्या व्यवस्थित पुढील परीक्षांसाठी सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात याव्यात. विद्यार्थ्यांस पुरवणी उत्तरपत्रिका हवी असल्यास ही १६ पानी उत्तरपत्रिकाच पुरवणी उत्तरपत्रिका म्हणून वितरीत करण्यात यावी. या दोन्हीही उत्तरपत्रिकांची नोंद संबंधित परीक्षा वर्गाच्या कनिष्ठ पर्यवेक्षकाच्या अहवालामध्ये होईल अशी काळजी घेण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत खराब झालेली उत्तरपत्रिका अथवा अर्धवट वापरलेली उत्तरपत्रिका रद्दी म्हणून फेकून देण्यात येऊ नये. तर त्याची नोंद घेऊन दप्तरी दाखल करावी. कारण आपल्या महाविद्यालयाच्या नावांवर या सर्व उत्तरपत्रिकांच्या अनुक्रमांकाची नोंद व स्विकारल्याची नोंद विद्यापीठ कार्यालयाकडे करण्यात येत आहे.

विद्यापीठ परिपत्रक क्र. १९४/२००६ दिनांक २० मे २००६ अन्वये (Learning Disability) **अध्ययन अक्षमता असणा–या विद्यार्थ्यांसाठी रंगीत उत्तरपत्रिका छापून घेण्यात आलेल्या आहेत.** तेव्हा अशा विद्यार्थ्यांसाठीची रंगीत उत्तरपत्रिकांची मागणी सोबतच्या तक्त्यामध्येच करावी. **रंगीत उत्तरपत्रिका हया अंध / अपंग विद्यार्थ्यांसाठी वापरल्या जात असल्याचे दिसून येत आहे. तरी त्याचा वापर त्यांच्यासाठी करण्यात येऊ नये.**

तरी आपणांस विनंती करण्यात येते की, **वरील परीक्षेच्या साहित्याची मागणी ऑनलाईन पध्दतीने** ***भरुन शनिवार दिनांक २५/८/२०१२ पूर्वी विद्यापीठ गोदाम विभागास पोहोचेल अशा बेताने*** **पाठवावी.** ऐनवेळी परीक्षेच्या साहित्याची मागणी केल्यास ती पुरविणे शक्य होणार नाही व अशा वेळी सदर परीक्षा साहित्य आपणास घेऊन जाण्याची व्यवस्था करावी लागेल याची कृपया नोंद घ्यावी.

**ऑक्टोबर /नोव्हेंबर २०१२ च्या विद्यापीठ परीक्षांच्या प्रात्यक्षिक उत्तरपत्रिकांचे गठ्ठे महाविद्यालयांनी परीक्षा गोदाम कक्षामध्ये जमा करु नयेत.** सर्व महाविद्यालयांनी प्रात्यक्षिक उत्तरपत्रिकांचे गठ्ठे आपल्या महाविद्यालयातच परीक्षा कस्टडीमध्ये ठेवावेत.

सर्व महाविद्यालय आणि संस्था यांनी विद्यापीठाच्या प्रत्येक परीक्षेपूर्वी **छायांकित प्रत संबंधीचे परिपत्रक पुणे विद्यापीठ कायदा/२००८/१०५, दि. १२/३/२००८ रोजी निर्गमित केलेले परिपत्रक १२३/२००८ अध्यादेश क्र. १८२ विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येईल या पध्दतीने महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावावे ही विनंती. अध्यादेश १८२ विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

## ऑनलाईन पध्दतीने फॉर्म भरण्यासाठी आवश्यक सूचना.

१. परीक्षा साहित्य मागविण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने फॉर्म भरावयाचा आहे.

२. ऑनलाइन सिस्टिम वापरण्याठी आपण आपल्या बीसीयूडी लॉग इनचा वापर करावयाचा आहे.

३. बीसीयुडी ऑनलाइनचा लॉग इन केल्यानंतर त्यात डाव्या हाताला **exam online** ची लिंक दिसेल.

४. ती लिंक क्लिक केल्यानंतर **exam godown** लिंक क्लिक करा.

५. इथे तुम्हाला **Demand entry** चे बटन दिसेल. ते क्लिक केल्यानंतर जो फॉर्म ओपन होईल त्यावर विचारलेली सर्व माहिती भरावयाची आहे.

६. ती माहिती **save** बटन दाबून **save** करा.

७. त्यानंतर त्या माहितीची प्रिंट काढून प्राचार्यांच्या सहीने विद्यापीठ परीक्षा गोदाम विभागात जमा करावी.

टीप :

ऑनलाईन फॉर्म एकदा ओपन केल्यावर २० मिनिटानंतर बंद होतो. त्यापूर्वी तो भरुन **save** करा. अन्यथा तुम्हाला पुन्हा लॉग इन करुन तो भरावा लागेल. त्यासाठी ऑनलाईन फॉर्म भरण्यापूर्वी सर्व माहिती कागदावर तयार करुन घ्या. मगच ऑनलाईन पध्दतीने भरा.

परीक्षा आयोजनासाठी नेहमीप्रमाणे सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपली विश्वासू,

डॉ. संपदा प्र. जोशी

(परीक्षा नियंत्रक)